# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2021-22)/36 / of 2022**

## परिपत्रक:

**विषय:— मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करून त्याचा अहवाल सादर करणेबाबत.**

संदर्भ:— शिक्षक संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. उशिसं/मराठी भाषा पंधरवडा/मवि—१/२०२१/१३१ दिनांक ०४ जानेवारी, २०२२.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना सदर परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दिनांक १४ ते २८ जानेवारी या कालावधीमध्ये साजरा केल्यानंतर त्या कार्यवाहीचा अहवाल विभागाच्या विभागीय सहसंचालक कार्यालयाकडे **दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२२** अखेरपर्यंत सादर करावा (प्रत संलग्न).

मुंबई—४०० ०३२
13 जानेवारी, २०२२

(सुधिर पुराणिक)
कुलसचिव

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक

************

Reg /ICD/2021-22/600 dt. 10/01/2022

# महाराष्ट्र शासन


शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

Web : www.dhepune .gov. in E-Mail :mavi. dhepune@gov.in

फोन नं.020/26122119,26051512,26130627,26124639 फॅक्स नं. 020/26111153.


क्र.: उशिसं/मराठी भाषा पंधरवडा/मवि-१/२०२१/९३७ दिनांक: ०४.०१.२०२२

## परिपत्रक

**वाचा- मराठी भाषा विभागाचे शासन परिपत्रक क्र.: मभापं-२०२१/प्र.क्र.१३६/भाषा-२ दि. २२.१२.२०२१**

महाराष्ट्र राज्याची राजभाषा असलेल्या मराठी भाषेचा, राज्य व केंद्र शासनाच्या सर्व कार्यालयांमध्ये तसेच इतर सर्व प्रकारच्या संस्थामध्ये अधिकाधिक वापर व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या हेतूने दरवर्षी **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दि. १४ ते २८ जानेवारी या कालावधीमध्ये साजरा करण्यात येतो."**

मराठी भाषा विभागाच्या, मराठी भाषेचा प्रचार व प्रसार या मुख्य धोरणास अनुसरुन मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यासाठी दरवर्षी विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना देण्यात येतात. तथापी, सध्याच्या कोविड-१९- ओमायक्रॉन या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून काही निर्बंध पाळणे आवश्यक आहे. त्यामुळे या पंधरवडयाच्या कालावधीमध्ये मोठया प्रमाणात प्रत्यक्ष कार्यक्रम साजरे करता येणार नाहीत. तथापी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन जास्तीत जास्त कार्यक्रम ऑनलाईन पध्दतीने साजरे करणे, सदर कार्यक्रम साजरे करताना सामाजिक माध्यमे, दूरचित्रवाणी इ. माध्यमातून मराठी भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी कार्यक्रम आयोजित करता येणे शक्य आहे.

उपरोक्त पार्श्वभूमीवर मराठी भाषा संवर्धन पंधरवडयानिमित्त सुयोग्य कार्यक्रम आयोजित करुन पंधरवडा समारंभपुर्वक साजरा करण्यासाठी शासन परिपत्रक क्र.: मभापं-२०२१/प्र.क्र.१३६/भाषा-२ दि. २२.१२.२०२१ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत. (प्रत संलग्न)

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषी विद्यापीठे, सर्व अभिमत विद्यापीठे, सर्व स्वयं अर्थसहायित विद्यापीठे आणि सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित, मॉडेल डिग्री महाविद्यालये व परिसंस्था यांचेकडून उपरोक्त शासन परिपत्रकातील सूचनांप्रमाणे मराठी भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी **दि. १४ ते २८ जानेवारी** या कालावधीत, ऑनलाईन पध्दतीने जास्तीत जास्त कार्यक्रम साजरे करण्यात यावेत. जिथे प्रत्यक्षरीत्या कार्यक्रम करणे शक्य असेल तिथे केंद्र तसेच राज्य शासन यांनी आखुन दिलेल्या कोविड मार्गदर्शन नियमांचे काटेकोरपणे पालन करुन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

या कार्यक्रमांकरीता येणारा खर्च प्रत्येक वित्तीय वर्षात त्या त्या संबंधीत विभागाने/कार्यालयाने त्यांच्या कार्यालयीन खर्चासाठी मंजूर होणा-या आर्थिक तरतूदीतून अदा करावा.

सर्व साहित्य संस्थांकडून उपरोक्तप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यासाठी सचिव, महाराष्ट्र

राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांना समन्वय अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात आले आहे.

प्रस्तूत प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सर्व संलग्नित महाविद्यालयांनी/संस्थांनी संबंधित विभागाच्या विभागीय सहसंचालक कार्यालयाकडे दि. ४ फेब्रुवारी, २०२२ अखेरपर्यंत सादर करावा. विभागीय सहसंचालक कार्यालयाने सर्व अहवाल संकलित करुन एकत्रित स्वरुपात दि. १० फेब्रुवारी अखेरपर्यंत या संचालनालयाच्या mavi.dhepune@nic.in या ई-मेल आय.डी. वर सादर करावा.

**(डॉ. धनराज माने)**
शिक्षण संचालक
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
३. कुलसचिव, सर्व अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
४. कुलसचिव, सर्व स्वयं अर्थसहायित विद्यापीठे- महाराष्ट्र राज्य.
५. प्राचार्य, सर्व शासकीय/ अशासकीय, अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित/मॉडेल डिग्री महाविद्यालये- महाराष्ट्र राज्य.